भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

Rs. 500

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

CC 789878

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

- 9 OCT 2023

अनु.क्र. 69046 दि.

मु.शु.रक्कम- 500/-

दस्ताचा प्रकार- हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का? होय/नाही.-

मिळकतीचे वर्णन-

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव- KNOWLEDGE CITY EDUCATION PVT. LTD. 401, Phoenix Commercial Complex, CTS No. 14, Bund Garden Road, Pune-411001. Maharashtra, India.

पत्ता-

दुसऱ्या पक्षकाराचे नांव- P.M.R.D.A.

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता- Prashant Bhalerao Dighi pune

नितीन एन. गांधी (परवाना नं.२२०१०५४)
शॉप नं.२१, केदार एम्पायर,
स्टेशन रोड, पुणे-३८ फोन-२५४६३४८४

हस्ते/मुद्रांक विकत घेणाराची सही

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

04 OCT 2023

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY
SUDHIR SHRAWAN SONAWANE
PUNE
REGD NO.10404
EXPIRY Dt. 24/10/2023
GOVERNMENT OF INDIA

# हमीपत्र

हमीपत्र आज रोजी दि. २० .१० .२०२३ या दिवशी,

मी, श्री. हरेश जयंतीलाल शाह, संचालक नॉलेज सिटी एज्युकेशन प्रा.लि. वय ५१ वर्ष, धंदा - नोकरी, ऑ.: ४०१, फिनिक्स कॉम्प्लेक्स, वंडगार्डन रोड, पुणे ०१.

हमीपत्र लिहून देतो की, मौजे लवळे, गट नवंर १२५३, १२६५ पैकी, १२६६ पैकी, १२६८ व १२६९ पैकी (Sector OCE – 8+8a+9 at Oxford City Township) यांसी एकूण क्षेत्र ७६२६५.५८ चौ.मी. या मिळकतीमध्ये शैक्षणिक वापर म्हणून दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत. व त्यासंबाधी आवश्यक त्या वरीष्ट भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सादर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देनेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी या हमिपात्राद्वारे स्वीकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु ण झाल्यास किवा अपुरा झाल्यास मी कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गळ्याचे विक्रीचे बुकिंग करतांना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतर सुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंग

नंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत फ्लॅट धारकाच्या खर्चाने पुरेसा पाण पुरवठा करून देण्याची माझी जबाबदारी राहील. पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत ला तोशीष लागू देणार नाही.

५) टॅंकर द्वारा किवा बोअर द्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी काळजी घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमिपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन कराराम्यात करण्यात येईल याची काळजी घेऊ.

७) हे हमीपत्र माझे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर फ्लॅट मधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी / आम्ही राजीखुशीने दि. .१० . २०२३ रोजी लिहून दिले आहे.

BEFORE ME

पुणे

SUDHIR S. SONAWANE
NOTARY GOVT.OF INDIA
PUNE

दिनांक - .१० . २०२३ हमीपत्र लिहून देणार

श्री. हरेश जयंतीलाल शाह,

संचालक नॉलेज सिटी एज्युकेशन प्रा . लि .

NOTED AND REGISTERED AT SERIAL NUMBER 1518 / 2023

10 OCT 2023